. **राशिभविष्य - ऑगस्ट, २०२२.**

**दादा दामले** (dadadamle@gmail.com)

================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला**

**तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे**

**निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

================================================================

**(१) मेष-** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत मंगळ -हर्षल -राहू असे तीन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे स्वभाव हट्टी, मानापमान फार असणारा असा घडेल व अकारण श्रम, दगदग करून शरीरपीडा निर्माण कराल. जपा. नोकरदार मंडळींच्या नोकरीत प्रतिकुल

परिस्थिती निर्माण होईल. शिवाय तो अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे उष्णताविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. येथील हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा घडेल; पण शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. राहूमुळे सतत अपमान होणे संभवते. त्यामुळे मनात सूडभावना निर्माण होण्याची शक्यता जाणवते. त्याच्यामुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना प्रतिष्ठा तर काहींना भूमिलाभ होणे संभवते. शिवाय तो धनदायकही होईल. हा शुक्र दिनांक ६ पासून या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत जात आहे. त्या काळात ज्यांच्याकडे शेतीवाडी आहे अशांना तो अनुकुल व लाभदायक होईल. या चतुर्थ

स्थानी कर्क राशीत प्रथमपासून रवि आहेच. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत जात आहे. त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना अनारोग्य, कार्य दिरंगाई, कौटुंबिक त्रास, दुःख, आर्थिक चिंता त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात तो स्वराशीत असला तरी मनस्थिती अस्वस्थच राहील व नोकरीत वरिष्ठांचा जाच होणे संभवते. तसेच तो अपघातकारकही असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध आहेच. तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे संततीपासून मनस्ताप दिला जाणे संभवते. हा बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत जात आहे. त्या काळात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, धनलाभ होणेही संभवते. शिवाय क्वचित कोणास प्रसिद्धी मिळण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत शनि असून तो लोखंड, पोलाद यांचा व्यापार असणारांना लाभदायक होईल. तसेच तो वकिली पेशा असणारांनाही अनुकूल होईल. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होतील; पण गुरूमुळे सामाजिक कार्याची आवड असणारांनाही तो अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास व अपेक्षाभंग होण्याची शक्यताही दिसते. श्रद्धा असेल तर “श्रीगणेश उपासना” व “श्रीहनुमान उपासना” अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:”तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत मंगळ --हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी, चिडखोर, मानापमान फार असणारा असा घडल्यास अकारण श्रम,दगदग कराल व थकावट जाणवेल. त्याशिवाय

अनारोग्य,आर्थिक चिंता त्रस्त  करतील. त्याशिवाय कसली तरी  चिंता अस्वस्थ करील. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, अपघात, वाईट  बेअब्रू  करणारे प्रसंग अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. येथील राहूमुळे दिखाऊ आचरण होईल  पण त्याच्यामुळे अर्थ लाभ  होणे संभवते.  या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारे सुखकारक होईल व त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभावते. हा शुक्र दिनांक १० पासून या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यावेळीही तो अनुकुल  होईल व  या राशीच्या  काही मंडळींना धनलाभ, काहींना मान,प्रतिष्ठा लाभेल; तर  काही मंडळींना भूमिलाभ होणेही  संभवते.   या राशीच्या तृतीय स्थानी प्रथमपासून रवि  आहेच.  तोही अनुकुल होईल व या राशीच्या काही  नोकरदार मंडळींवर वरिष्ठ प्रसन्न होतील. सर्व सुख मिळेल व आरोग्य उत्तम राहील.  महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि  या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत जात आहे. त्या काळात तो प्रतिकुल होईल  व त्याच्यामुळे अनारोग्य, कौटुंबिक त्रास, दुःख, कार्यदिरंगाई होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध  आहेच. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या  पंचम स्थानी कन्या राशीत  जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या  पूर्वार्धात अनुकुल  होईल व त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. पण महिन्याच्या  उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे संतती,स्त्रीकडून  मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते.  या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा  राशीत केतु असून तो अनुकुल  होईल व  त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, आचारविचार उच्च होतील, सर्व ठिकाणी सहकार्य मिळेल व काही मंडळींना प्रसिद्धीही मिळेल.  या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत शनि असून  तो  वकिली व उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक  व यशदायक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी मीन  राशीत गुरु व नेपच्यून  असे दोन ग्रह असून गुरुमुळे सर्व सुख व ऐषाराम मिळेल व धनलाभ होणेही संभवते. पण नेपच्यून प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त  करतील. श्रद्धा असेल तर  श्रीशिवशंकराची  व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर' मनापासून श्रद्धेने  “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण  करा. रात्री झोपी  जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय  दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नम :” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम

ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शुक्र असून तो दिनांक ६ पासून या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे स्मपूर्ण महिन्याच्या काळात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. शिवाय धनलाभ होणेही संभवते. या धनस्थानी कर्क राशीत प्रथमपासून रवि आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, भांडणे, आर्थिक चिंता व वित्तहानी होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सर्व सुख लाभेल, आरोग्य सुधारेल, नोकरीत वरिष्ठ प्रसन्न होतील व विविध प्रकारचे लाभ होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत जात आहे. त्याच्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात संमिश्र प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता आहे. अकारण शत्रुत्व होणे, हितशत्रूपासून त्रास होणे, धननाश होणे संभवते. पण त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळू शकेल. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतु असून तो गूढ संशोधन कार्यक्षेत्र असंणाराना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत शनि
असून तो पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे दुःख, दैन्य, विचित्र आजार होणे संभवते. शिवाय तो अपघातकारकही आहे. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु बौद्धिक व बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. वरिष्ठ तुमच्या कामाचे कौतुक करतील, त्यातून काही मंडळींचा सन्मान होणेही संभवते. क्वचित कोणास उच्च पद मिळणेही संभवते. काही मंडळींना आवडते,नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती चंचल, अस्थिर अशी होईल; पण तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार -व्यवासाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. अर्थप्राप्तीसाठी कठोर कष्ट-परिश्रम करावे लागतील.

आर्थिक चिंता त्रस्त करील. मनस्थिती अस्वस्थ राहील, पण त्याच्यामुळे एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. येथील राहूमुळे संततीविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शिवाय ज्यांच्या हाती अधिकार आहे अशापैकी काहींना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याची प्रबळ इच्छा अस्वस्थ करील.जपा. श्रद्धा असेल तर “दुर्गा देवीची उपासना “ अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “ जगदंबा “श्रीदुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः: शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या व्ययस्थानी शुक्र असून तो दिनांक ६ पासून या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी प्रथमपासून रवि आहेच;पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे शरीरपीडा, मानभंग, अनारोग्य, आर्थिक चिंता त्रस्त करतील व थकावट जाणवेल. या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध आहेच. पण तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे तोही संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होईल, हितशत्रू मनस्ताप देतील, असह्य दुःख होणे संभवते. पण त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे कसली तरी चिंता त्रस्त करील. कोणाशी पटणार नाही. शिवाय तो विषभयकारकही आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. पण त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून त्यांच्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. गुरुमुळे उत्कर्ष होईल, सद्गुणांची वाढ होईल, प्रवासयोग येईल. नेपच्यूनमुळे सूचक स्वप्ने पडतील व काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल-राहू असे तीन ग्रह

असून येथील हर्षल व राहू अनुकुल होतील व हर्षलमुळे उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कार्यात प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना बढती मिळू शकेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांनाही तो लाभदायक होईल. राहूमुळे नोकरीत अधिकार पद मिळेल व काही मंडळींचा सन्मान होणेही शक्य दिसते. पण मंगळ औषधविक्रेत्यांना व यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांनाच अनुकुल व लाभदायक होईल. इतरांना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. शिवाय वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच सहन करावा लागेल. इतर व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याशी शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत गेल्यावर मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता दिसते. पण त्याच्यामुळे या राशीच्या काही भाग्यवंतांना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल आणि मनःशक्ती व मनशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो दिनांक ६ पासून या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो अनुकुल होईल व सुखसमाधान, ऐषाराम लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत प्रथमपासून रवि आहेच व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहे. या राशीच्या प्रथम स्थानी प्रथमपासून बुध आहेच व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे रवि -बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, आर्थिक चिंता, मानभंग ,दुःख, मित्रद्रोह अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतु
असून त्याच्यामुळे मानसिक दुःख होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत शनि असून तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. शिवाय तो दुःख दैन्यकारकही

आहे. तसेच त्याच्यामुळे एखादा विचित्र आजार होणे संभवते . जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. पण येथील नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहू नका. बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून मंगळामुळे प्रवासात मनस्ताप, मानहानी होण्याची शक्यता दिसते. म्हणून शक्यतो प्रवास करु नका. हा मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. नोकरदार मंडळींना कामाचा असह्य ताण सहन करावा लागेल. शिवाय काही मंडळींना वरिष्ठांचा जाचही सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण हा मंगळ औषध विक्रेते व यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होण्याची शक्यता आहे. भाग्यस्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. येथील राहू बुद्‌धिमान मंडळींना अनुकुल व प्रगतिकारक होईल. श्रद्‌धा असेल तर भगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्‌धेने “विष्णुसहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्‌धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो दिनांक ६ पासून या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात तो प्रतिकुल होईल व नंतरच्या संपूर्ण काळात तो अनुकुल होईल व सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासून रवि आहेच. व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे शासकीय नोकरीत असणारांपैकी काहींना बढती मिळू शकेल व क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. आर्थिक स्थिती सुधारेल व सामाजिक दर्जा प्राप्त होऊ शकेल. स्वतंत्र व्यवसाय

असणारांच्या व्यवसायात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व काही मंडळींना शरीरपीडा त्रस्त करील तर काहींचा मानभंग होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत प्रथमपासून बुध आहेच; व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. मानहानी होणेही शक्य दिसते. त्यातून अनारोग्य होईल. धननाश होणेही संभवते. त्याशिवाय चित्त चंचल होईल व त्यातून मित्रद्रोह होणे, कुसंगतीची बाधा होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे मनस्थिती स्वार्थी, संशयी होईल व बुद्धी व्यवहारी बनेल. पण चिकाटीचा गुण प्राप्त होईल व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून त्याच्यामुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील व प्रवासयोग येण्याची शक्यता आहे. त्याशिवाय अर्थलाभ होणेही संभवते. पण येथील नेपच्यून प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनात संकटे येणे संभवते. किंवा सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल -राहू असे तीन ग्रह असून मंगळामुळे अनारोग्य, हाडमोड होणे, फार कष्ट-परिश्रम करावे लागणे, वीज व पाणी यांपासून धोका असणे संभवते. हर्षलमुळे अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. राहूमुळे वाममार्ग धन मिळविण्याची इच्छा प्रबळ होईल. येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळात शक्यतो प्रवास करू नका. कारण त्याच्यामुळे प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीदुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “दुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करतांना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नम::” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नम::” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून त्याच्यामुळे सुख, ऐषाराम मिळेल, पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे रस्त्याने सावधानतेने चाला व वाहन नियंत्रित वेगाने व सावधानतेनेच चालवा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत शनि असून तो गृहसौख्यास बाधकच होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे आरोग्य सुधारेल; पण नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना आपल्याला कसला तरी आजार झाल्याची भावना त्रस्त करील. तसेच काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० रोजी या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत जात आहे. येथील मंगळ, हर्षल व राहू हे तिन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांच्या भागीदारीतही विविध कारणांनी बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो दिनांक ६ पासून या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत जात आहे. या दशम स्थानी प्रथमपासून रवि आहेच व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे रवि महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायकच होईल. पण भाग्यस्थानी असलेला शुक्र केवळ महिन्याच्या प्रथम सप्ताहातच अनुकुल होईल व नंतर तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर स्वतंत्र व्यवसाय असणाराच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासून बुध असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल, लाभदायक व सुखकारक होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल तेव्हा अनारोग्य, कार्य अपयश, मानहानी होण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकाराची उपासना व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नम::" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र "स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नम::" तारक

मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी ""ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना मनासारखी उत्तम नोकरी मिळेल. काही मंडळींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक चिंता त्रस्त करीलसे दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अति भावनाशील होणे संभवते. पण तो अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना त्यांच्या संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. येथील गुरुमुळे प्रेमसंबंध वाढतील, अर्थलाभ होईल व सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, इजा होणे, अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागणे, आर्थिक नुकसान होणे, चोरी होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय तो विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत वाद, भांडणे, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा निर्माण करील. जपा. येथील हर्षलमुळे मनस्थिती चंचल, अस्थिर होणे संभवते. शिवाय तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक असला तरी ज्यांचा खोल विचार करून संशोधन करण्याचे कार्यक्षेत्र आहे त्यांनी मेंदूला विश्रांती द्यावी. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकार होणे संभवते. येथील राहूमुळे परधर्मियांशी ज्यांचा व्यावसायिक संबंध आहे अशांना तो लाभदायक होईल. पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो दिनांक ६ पासून या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. हा शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर काही मंडळींना गुरुकृपा, काहींना थोरकृपा प्राप्त होईल व कीर्ती,प्रसिद्धी प्राप्त होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून रवि

असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. शिवाय अनारोग्य होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे नोकरदार मंडळींना विविध प्रकारचे लाभ होतील. या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध आहेच व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी,चंचल अस्थिर असा होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान यांची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष" स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्रये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी " मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्याचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु** - या राशीच्या धनस्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींची स्थावर खरेदी-विक्रीची कामे अपेक्षेनुसार पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. येथील नेपच्यूनमुळे घरगुती परिस्थितीत गैरसमज, आर्थिक घोटाळे अशापैकी कारणांनी कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत मंगळ - हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे अनारोग्य, स्थावरसंबंधी त्रास, संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय चोरी होणे, अपप्रचाराचा मनस्ताप होणे, आर्थिक हानी होणेही संभवते. येथील हर्षल कालापोषक असून त्याच्यामुळे काही मंडळींना अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होण्याची शक्यताही दिसते. तसेच उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र

असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. येथील राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत शुक्र असून दिनांक ६ पासून तो या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो अनुकुल व सुखकारकच होईल. त्याच्यामुळे या राशीच्या प्रेमिकांचे प्रेमविवाह होणे संभवते. तसेच विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. त्याचप्रमाणे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत प्रथमपासून रवि आहेच. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल. त्याच्यामुळे भय, निराशा, अनारोग्य, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे, मानसिक ताण सहन करावा लागणे, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून बुध असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे .भांडणे होणे, नियोजित कार्यात अडचणी,अडथळे, दिरंगाई निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल व धनवृद्धी होईल. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे प्रवास योग येतील, सुखसमाधान लाभेल, यशप्राप्ती होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत शनि असून त्याच्यामुळे स्वतः:चे किंवा जीवनसाथी /संगिनीचे अनारोग्य, नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील काही प्रिय जनांचे दूरत्व निर्माण होणे, अशापैकी घटना घडल्यास मनस्थिती अस्वस्थ होणे संभवते. या राशीच्या तृतीय

स्थानी मीन राशीत गुरु-नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. काही मंडळींना प्रवासयोग येईल. पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण तो अध्यात्म, गूढविद्या यांची मनापासून आवड असणारांना अनुकुल होईल व त्यांची आध्यात्मिक प्रगती होईल आणि गूढ संशोधनात यश लाभेल. तसेच या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल- राहू असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे कौटुंबिक जीवनात असमाधानकारक घटना घडणे, गैरसमजाने वाद, भांडणे होणे, कोणाशीही न पटणे, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान नसणे, सतत तक्रारी करणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे अशापैकी घटना घडणे संभवते. येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत गेल्यावर संततीपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे गैर आचरण अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. काही मंडळींना स्थावरसंबंधीची समस्या त्रस्त करील. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत शुक्र असून त्याच्यामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना कलागुणसंपन्नता असूनही ती गुणवत्ता प्रकट करण्याची संधीच मिळणार नाही, पण येथील शुक्र दिनांक ६ पासून या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत गेल्यावर अनुकुल होईल व प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत प्रथमपासून रवि आहेच व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, संततिसुखात बाधा येणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी कन्या या स्वराशीत जात आहे. असे असले तरी तो महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होईल व सुखसमाधान लाभेल, कार्यसिद्धी होईल व यश लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे भांडणे होणे, नियोजित कार्यात अडथळे येणे, कार्यदिरंगाई होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे नोकरदार मंडळींना नोकरीत मनस्ताप सहन करावा लागेल. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी सहनशील बनून आहे ती नोकरीच

मनापासून करावी. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने ""शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झो[पी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या धनस्थानी मीन राशीत गुरु-नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण गुरुमुळे कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील व स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होणे संभवते, शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना अधिकारपद मिळण्याची शक्यता दिसते. शिवाय अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह बऱ्याच प्रमाणात अनुकुल होतील. मंगळामुळे धैर्य, हिम्मत, महत्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तबगारी घडेल. प्रवासयोगही संभवतो. पण एखादी शारीरिक इजा होणेही संभवते. हर्षलमुळे उच्च बौद्धिक शक्ती, आकलनशक्ती,स्मरणशक्ती व चौकसपणा प्राप्त होणे संभवते. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. राहूमुळे हातून काही कर्तृत्व किंवा पराक्रम घडेल. मनस्थिती विशाल होईल. पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळात कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना अशापैकी मनस्तापदायक गोष्टी घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. आवडता छंद जोपासता येईल. पण हा शुक्र महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहातच या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत जात असल्यामुळे
सर्व प्रकारच्या कलाकारांना आपले कलेतील कौशल्य प्रकट करण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत प्रथमपासून रवि आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो नोकरी-व्यवसाय असणारांना

अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इजा होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक हानी होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो केंद्रस्थानी असल्यामुळे अनुकुल होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध आहेच. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे, वियोग अशापैकी घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे . कार्यसिद्धी होईल, यश मिळेल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे हातून ढोंगी, धूर्त प्रकारचे आचरण होणे संभवते. शिवाय तो संततिसुखातही बाधा निर्माण करू शकेल. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे विविध प्रकारच्या संकटांशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. त्यातून मानहानी होणे, अनारोग्य होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी ":ओम अजैकचरणाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल होईल व त्यामुळे मानसिक संवेदनाहीअति जलद होतील. तसेच मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहिरे नैराश्य येईल. पण येथील गुरु अनुकुल व शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, व तो बौद्धिक व बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल,

प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत मंगळ -हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण तो या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिंमत,

महत्त्वाकांक्षा वाढेल. हातून काही कर्तृत्व घडेल. प्रवासयोग येईल; पण एखादी इजा, दुखापत होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या हर्षलमुळे बुद्धी चंचल, अस्थिर, अविचारी अशी होईल, विक्षिप्त आचरण घडेल व आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही समजणार नाही. येथील राहूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील व कौटुंबिक जीवनात कलह निर्माण होतील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो दिनांक ६ पासून या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो अनुकुल होईल व या राशीच्या ज्या मंडळींची शेतीवाडी आहे अशा मंडळींना त्यापासून लाभ होईल. पण तो या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर सर्व प्रकारच्या कला क्षेत्रातील मंडळींना आपापल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत प्रथमपासून रवि आहेच व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात भय असून नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. मनस्थिती अस्वस्थ राहील व कुटुंबातील काही प्रिय जनांचे दूरत्व निर्माण झाल्यास मनस्थिती अधिकच अस्वस्थ होईल. पण तो या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशी गेल्यावर दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, मानसिक शांति लाभेल, व हितशत्रू पराभूत होतील. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत प्रथमपासून बुध आहेच व तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व कार्यसिद्धी होईल. काही मंडळींना प्रसिद्धी मिळू शकेल व धनलाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे दुःख, भांडणे, अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे अनारोग्य, अपघातभय, कौटुंबिक व वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत शनि असून तो सर्वसाधारणपणे अनुकुल होईल, अर्थवाद होईल; पण संततीस कसला तरी त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ,मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय

**नमः:" तारक मंत्राचा अणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.**

**=====OOOOOOOOOOO=====**